महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा विभाग, भंडारा.
इंद्रलोक सभागृह समोर, नागपुर रोड, भंडारा. (४४१९०४)
दुरध्वनी क्र.:– ०७१८४–२५४८६६ ई–मेल dcstbhn@rediffmail.com

क्र.राप/विनि/भं/आस्था/ई–५७/१२१० दि.१०/०७/२०२५

प्रति,
१.मा.सहाय्यक आयुक्त,जिल्हा कौशल्य, विकास व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र,भंडारा/गोंदिया.
२.प्रकल्प अधिकारी,एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,देवरी/भंडारा/गोंदिया.
३.अंशकालीन प्राचार्य,मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सुचना केंद्र,व्दारा आय.टी.आय. भंडारा/गोंदिया.
४.जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्र,अधिकारी, भंडारा/गोंदिया.

विषय:– सन २०२५–२६ या सत्राकरीता एक वर्षासाठी कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्रशिक्षणार्थी म्हणून भरतीबाबत.

संदर्भ:– १)मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक क्र. ११/२०१७, दि.२२.०३.२०१७.
२)क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/घसं/७०६८,दि.०८.१२.२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की,सोबत जोडलेल्या अधिसुचि पत्रात शिकाऊ उमेदवारांची एक वर्ष मुदतीकरीता सन २०२५–२६ सत्रातील संदर्भिय परिपत्रकानुसार ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करण्यात येत असल्याने सदर बाबतीत खालीलप्रमाणे सुचना प्रसारीत करण्यात येत आहे.

१. आय.टी.आय.उत्तीर्ण व संदर्भिय पत्र क्र.०२ अन्वये शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणाऱ्या विहित केलेल्या **महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे ०१ व ०२ वर्ष कालावधीचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या उत्तीर्ण उमेदवारांनी** सर्वप्रथम निवडीकरीता संगणकीय प्रणाली सुरू झाल्याने शिकाऊ उमेदवारी सत्र २०२५–२६ या कालावधीकरीता उपरोक्तप्रमाणे प्रशिक्षित प्रत्येक उमेदवाराने Skill India पोर्टल वरील www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाईटवर आधार लिंक करून ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर M.S.R.T.C.Bhandara या आस्थापनेकरीता (Establishment) ऑनलाईन अप्लाय करणे आवश्यक आहे. जे उमेदवार सदरच्या वेबसाईटवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतील त्याच उमेदवारांची अटी व शर्तीच्या अधिन शिकाऊ उमेदवार म्हणून भरती करण्यात येईल व त्याच उमेदवारांचे कॉन्ट्रॅक्ट फॉर्म जनरेट होतील.

२. आपल्या संस्थेमधून सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील अ.क्र.०१ ते ०९ वरील आय.टी.आय.व्यवसाय व अ.क्र.०१,०४ ते ०७ व ०९ वरील **महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे ०१ व ०२ वर्ष कालावधीचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण करून** उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उपरोक्त वेबसाईटवरील ऑनलाईन रजिस्ट्रेशन बाबत कृपया माहीती देण्यात यावी. शिकाऊ उमेदवारीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांना वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी Skill India पोर्टल वेबसाईटवर M.S.R.T.C.Bhandara या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करण्याबाबत आपल्या स्तरावर उमेदवारांना सुचना देण्यात याव्यात.

३. ज्या उमेदवारांनी M.S.R.T.C.Bhandara या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय केले आहे. त्या उमेदवारांस या कार्यालयातील शिकाऊ उमेदवारीकरीता विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरण्याकरीता **दिनांक १४.०७.२०२५ ते दिनांक २३.०७.२०२५** या कालावधीत (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते १५.०० या वेळेत विभागीय कार्यालय, रा.प.महामंडळ, भंडारा येथे रजिस्ट्रेशनची छायांकित प्रत सादर करून संपर्क साधण्याच्या सुचना देण्यात याव्या. अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख दिनांक २३.०७.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कुठल्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची नोंद उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

४. अर्जदाराने पासपोर्ट साईज फोटो,आय.टी.आय./महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे ०१ व ०२ वर्ष कालावधीचे व्होकेशनल अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र व संपूर्ण सत्राच्या वेगवेगळया गुणपत्रिका, जन्मतारखेचा दाखला (टी.सी./बोनाफाईड) १० वी गुणपत्रिका तसेच मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला, आधार कार्ड इत्यादींची स्वसाक्षांकित/प्रमाणित छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

५. ज्या उमेदवारांनी M.S.R.T.C.Bhandara या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय केले असतील, अशा शिकाऊ उमेदवारांना भरती प्रक्रिया शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | अर्जाची शुल्क | शेरा |
|---|---|---|---|
| १ | आय.टी.आय.व व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम प्रशिक्षीत उमेदवार | रू.५९०/–(जि.एस.टी.सह) | मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गासाठी |
| | | रू.२९६/–(जि.एस.टी.सह) | अनु.जाती व अनु.जमातीसाठी |

वरील रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डि.डी.) **MSRTC FUND A/C BHANDARA** यांचे नावे काढलेला असावा. भंडारा जिल्हा स्तरावरील बॅकेत अधिदानीत होणारा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवारांनी त्यांचे नाव व पत्ता तसेच ट्रेडचे नाव लिहीणे आवश्यक आहे. उमेदवाराने जमा केलेले शुल्क परत केले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

६. शिकाऊ उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया रद्द केली असल्याने कार्यशाळा शिकाऊ उमेदवाराची निवड करतांना आय.टी.आय.व व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार (उत्तीर्ण केलेल्या प्रयत्नांचा विचार करून) गुणवत्ता यादी व्यवसायानुसार तयार करून शिकाऊ उमेदवाराना गुणवत्तेनुसार व व्यवसाय निहाय रिक्त जागांनुसार निवड करण्यात येईल. उमेदवार अनुत्तीर्ण झाला व त्याच्या शैक्षणिक सत्रात खंड पडला तर आय.टी.आय. व व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या एकुण प्राप्त गुणांवरील टक्केवारी न धरता ३५ टक्के गृहीत धरण्यात येईल.

७. शिकाऊ उमेदवारीसाठी निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल व त्यात पात्र ठरणा–या उमेदवारांचे रा.प.महामंडळाशी करार (Online Contract) केल्यानंतरच त्यांना शिकाऊ उमेदवारी करीता रूजु करून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. जर करार **(Online Contract)** झाला नाही तर शिकाऊ **उमेदवारीकरिता दावा राहणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवाराने करार कालावधीत शिकाऊ उमेदवारी पूर्ण करणे आवश्यक आहे.**

८. उमेदवारांची शिकाऊ उमेदवार म्हणून निवड झाल्यास सदरची नेमणूक उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना राज्य परिवहन महामंडळात सहाय्यक पदामध्ये अथवा अन्य कोणत्याही पदात तात्पुरता अथवा कायमस्वरूपी सेवेसाठी कुठलाही आधार घेता येणार नाही किंवा प्रशिक्षण पूर्ण केले याआधारे सेवेत सामावून घेण्याचे बंधन रा.प.महामंडळावर राहणार नाही, याबाबत प्रतिज्ञापत्र दयावे लागेल. सदर शिकाऊ उमेदवार भरतीबाबतचे सर्व हक्क रा.प.महामंडळाकडे अबाधित राहील.

९. शिकाऊ उमेदवाराचे विहीत रा.प. नमुन्यातील अर्ज दिनांक **१४.०७.२०२५** ते दिनांक **२३.०७.२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते १५.०० वाजेपर्यंत शनिवार,रविवार व सुटीचे दिवस वगळून** या कार्यालयातून दिल्या जातील. तसेच परीपूर्ण भरलेले अर्ज **दिनांक २३.०७.२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत** स्विकारले जातील. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाही. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळाचे सेवेत सामावून घेण्याची जबाबदारी रा.प.महामंडळावर राहणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरातीची एक प्रत सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबतः–** विवरण पत्र

(तनुजा अ.अहिरकर)
विभाग नियंत्रक
राज्य परिवहन,भंडारा.

प्रत सादर रवाना:–

१)मा.महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.),रा.प.मध्यवर्ती कार्यालय,मुबई–०८,यांचे माहितीस्तव सविनय सादर.

२)मा.प्रादेशिक व्यवस्थापक,सनियंत्रण समिती क.०३,रा.प.नागपुर प्रदेश, यांचे माहीतीस्तव सविनय सादर.

३)यंत्र अभियंता (चा)/विभागीय वाहतुक अधिकारी/विभागीय भांडार अधिकारी/विभागीय कर्मवर्ग.अधिकारी/ कामगार अधिकारी/विभागीय अभियंता (स्था.)/विभागीय लेखा अधिकारी/विभागीय सांख्यिकी अधिकारी/सुरक्षा व दक्षता अधिकारी/विभागीय वाहतुक अधिक्षक (अप), रा.प.भंडारा.

४)आगार व्यवस्थापक, रा.प.भंडारा/गोंदिया/साकोली/तुमसर/तिरोडा/पवनी.

सदर जाहिरात पत्रासह आपले अधिनस्थ शाखेत प्रदर्शित करावी व प्रदर्शित केल्याबाबत २ कर्मचाऱ्याच्या स्वाक्षरी तारखेसह घेऊन मुळप्रत दप्तरी ठेवून एक प्रत या शाखेस पाठवावी.

सोबत:– विवरण पत्र

(तनुजा अ.अहिरकर)
विभाग नियंत्रक
राज्य परिवहन,भंडारा.

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,भंडारा विभाग,भंडारा

## —// विवरण पत्र //—

### शिकाऊ उमेदवार भरती बाबतची शैक्षणिक व ईतर पात्रता सन २०२५—२०२६

| क्र. | शिकाऊ उमेदवारी प्रवर्ग व्यवसायाचे नाव | विद्यावेतन | भरावयाच्या पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता व ईतर अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | यांत्रिक मोटार गाडी (एम.एम.व्ही.) | १०९५३/— | ११५ | १०वी उत्तीर्ण, आय.टी.आय.२ वर्षे (यांत्रिक मोटार गाडी) अभ्यासक्रम परीक्षा पास किंवा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |
| २. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशियन) | १०९५३/— | २१ | १० वी उत्तीर्ण, आय.टी.आय. ०२ वर्षे वीजतंत्री अभ्यासक्रम परीक्षा पास |
| ३ | ऑटो इलेक्टिशीयन | ९७३६/— | ०४ | १०वी उत्तीर्ण, आय.टी.आय. ०१ वर्षे ऑटो इलेक्ट्रीशियन अभ्यासक्रम परीक्षा पास |
| ४ | पत्रे कारीगीर (शिट मेटल वर्क) | ९७३६/— | १८ | १० वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०१ वर्षे शिट मेटल वर्क अभ्यासक्रम परीक्षा पास किंवा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |
| ५. | सांधाता (वेल्डर) | ९७३६/— | १६ | १०वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०१ वर्षे साधाता (वेल्डर) अभ्यासक्रम परीक्षा पास किंवा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |
| ६. | रंगारी पेंटर (जनरल), | १०९५३/— | १० | १०वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०२ वर्षे पेटर (जनरल) अभ्यासक्रम परीक्षा पास व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |
| ७ | यांत्रिकी (प्रशितन व वातानुकुलिकरण) | १०९५३/— | ०८ | १० वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०२ वर्षे यांत्रिकी (प्रशितन व वातानुकुलिकरण अभ्यासक्रम परीक्षा पास व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |
| ८ | कातारी (टर्नर) | १०९५३/— | ०३ | १०वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०२ वर्षे टर्नर अभ्यासक्रम परीक्षा पास |
| ९. | डिझेल मेकॅनिक | ९७३६/— | ३६ | १० वी उत्तीर्ण, आय.टी.आय.०१ वर्षे डिझेल मेकॅनिक अभ्यासक्रम परीक्षा पास किंवा व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पुर्ण केलेले उत्तीर्ण विदयार्थी |

यांत्रिक पदाकरीता आय.टी.आय.व व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. यापूर्वी ज्यांनी रा.प.मध्ये किंवा इतर ठिकाणी शिकाऊ उमेदवारी पूर्ण केली असेल किंवा सध्या करीत असेल, त्यांनी अर्ज करू नये.

**दि.१४.०७.२०२५ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.(मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम)** त्याकरीता शासनाच्या सुधारीत नमुण्यातील १९९५ नंतरची दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकित प्रत जातीच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करावी. विहीत रा.प.नमुन्यातील छापील अर्ज विभागिय कार्यालय, रा.प.भंडारा येथून घेऊन त्यासोबत मागासवर्गीय उमेदवार असल्यास **(अनु.जाती व अनु.जमाती फक्त) रू.२९६/— (जि.एस.टी.सह)** (शासनाच्या सुधारीत नमुण्यातील १९९५ नंतरची जातीच्या दाखल्याची प्रमाणित प्रत असणे आवश्यक) व **खुला व इतर प्रवर्गातील उमेदवारास रू.५९०/— (जि.एस.टी.सह) चा डि.डी. एम.एस.आर.टी.सी.फंड अकाऊंट, भंडारा** यांचे नावे काढलेला असावा. भंडारा जिल्हा स्तरावरील बॅकेत अधिदानित होणारा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट (डि.डी.) जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवारांनी त्यांचे नाव व पत्ता तसेच ट्रेडचे नाव लिहीणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने दिलेले शुल्क परत केले जाणार नाही. अर्ज सादर करतांना अर्जावर उमेदवाराचा फोटो लावणे आवश्यक राहील. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारने राजकिय किंवा इतर अधिका—याकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रदद करण्यात येईल. सदरच्या मागणीपत्रात नमुद केलेल्या सर्व व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची पदे कमी किंवा जास्त अथवा रदद करण्याचे अधिकार रा.प.महामंडळास राहील. **दि.२३.०७.२०२५ पर्यत सायंकाळी १७.००** वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. **अर्जासोबत पोर्टलला अप्लाय केल्याची प्रत, आधार कार्ड, औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रमाणपत्र (२/४ सेमेस्टर गुणपत्रिका व एकत्रीत गुणपत्रिका,प्रमाणपत्र)** जन्मतारखेकरीता शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा प्रमाणपत्र, व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

Scanned with OKEN Scanner